# " महात्मा गांधी यांचे जात आणि वर्णव्यवस्थे विषयक विचार "

**ज्योती प्रकाश बनसोडे**, संशोधक विद्यार्थिनी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ,*कोल्हापूर*.

---

**प्रस्तावना:-**

भारतीय समाजव्यवस्था हि वर्णाधारित वर्णाश्रम व्यवस्थेचा पुरस्कार असणारी असल्याने वर्षानुवर्षे ती स्थितीशील राहिलेली आहे. या व्यवस्थेचा आणखी एक विशेष पैलू म्हणजे भारतातील जातीव्यवस्था आणि याच अन्यायकारी जातीय व्यवस्थेशी संबंधित असलेला अस्पृश्यतेचा प्रश्न होय. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात जातीयता आणि अस्पृश्यतेचा प्रश्न ऐरणीवर होता. हे प्रश्न राजकीय व सामाजिक सुधारणेच्या स्तरावर आणण्याचे श्रेय महात्मा गांधी व बाबासाहेब आंबेडकर यांना द्यावे लागते.

संशोधन पद्धती:-शास्त्रीय संशोधन पध्दत.

तथ्य संकलन :– दुय्यम साधने.

**उद्दिष्ट्ये :-**

१) महात्मा गांधीजींच्या जडणघडणीचा अभ्यास करणे.

२)महात्मा गांधी यांच्या जात आणि वर्णव्यवस्थ्ये विषयक विचारांचा व कार्यांचा अभ्यास करणे.

**गृहीतके :-**

१) महात्मा गांधीजींच्या वैचारिक जडणघडणी मुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास झाला आहे.

२) महात्मा गांधी यांच्या जात आणि वर्णव्यवस्थ्ये विषयक विचारांचा व कार्यांचा सैध्दांतिक दृष्टीकोनातून महत्वाचे आहेत.

**संकल्पना :-**

**जात :-** नेसफील्डयांच्या मते "जात" म्हणजे असा समुदाय कि जो इतर कोणत्याही समुदायाशी संबंध ठेवीत नाही.

**वर्ण :-** 'वर्ण' हा शब्द संस्कृत भाषेतील 'वृ' अरण अथवा 'वृ' धातू पासून बनला आहे. त्याचा अर्थ वरण करणे अथवा निवड करणे होय.

महात्मा गांधी हे स्वतःला 'सनातनी हिंदू' म्हणवणाऱ्या वर्ण, जाती आणि अस्पृश्यता या विषयी वृत्तपत्रे व भाषणा मधून विचार व्यक्त झालेले आहेत.

**वर्णव्यवस्था :-**

गांधीजी वर्णव्यवस्थ्येला सामाजिक संघटनेचे स्वाभाविक नियम मनात होते. त्यांच्या मते वर्णातील उच्च-नीच व अस्पृश्यातही वर्णव्यवस्थ्ये मध्ये झालेल्या विकृती मधून आली आहे. वर्णाश्रम धर्म या जगातील माणसांच्या जीवनध्येयाची परिभाषा करतो.

महात्मा गांधीजी वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था यांमध्ये फारकत केली नव्हती. ते दोन्ही एकच आहेत असे ते मानून त्याचा समानार्थीच वापर करत होते. वर्णव्यवस्था मानवी स्वभावाची स्वाभाविक लक्षण आहे. हिंदू धर्माने केवळ त्यास व्यावहारिक रूप दिले आहे. हिंदू धर्मशास्त्रा प्रमाणे वर्ण जरी वेगवेगळे असले तरी ते समान असल्याचे सांगतात. वर्ण विभाजनातून कर्तव्याचा अर्थबोध होतो. वर्णावर आधारित वर्णव्यवस्थ्येचे पालन करणे, वर्णव्यवस्था हि यांचे संबंध नसून व्याक्तुगात प्रगतीसाठी म्हणजेच स्वतःचे ज्ञानवाढवण्यासाठी , उदरनिर्वाहासाठी तसेच दुसर्या वर्णाचे ज्ञान आणि कौशल्य व्यक्ती आत्मसात करू शकते असे त्याचे मत होते. प्रत्येक व्यक्तीने आपल्या वर्णाचा व्यवसाय जीवन निर्वाहाचे साधन म्हणून करावा. वर्णव्यवस्था व्यक्तीच्या बौध्दिक विकासात कोणताही अडथळा निर्माण करीत नाही. वर्णव्यवस्था हि मानवतेला हिंदू धर्माने प्रदान केलेली महान देणगी आहे.

***वर्णव्यवस्थ्येसंबंधी गांधीजींची मते,***

१) वर्णव्यवस्था हि जन्माधिष्ठित आहे असा त्यांचा विश्वास आहे.

२) वर्णव्यवस्था हि जीविकोपार्जनाच्या साधनांशी निगडीत आहे.

३) वर्णव्यवस्थेचा उद्देश स्पर्धा वर्ग संघर्ष आणि वर्गयुद्ध टाळणे हा आहे. माणसांची कर्तव्ये आणि व्यवसाय निश्चित करणारी व्यवस्था आहे.

4) वर्णव्यवस्थेत कोणालाही आपला व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नाही. त्यांचा व्यवसाय त्यांच्या करिता वंशपरंपरेने निर्धारित केला जातो.

अश्या प्रकारे वर्णव्यवस्थेसंबंधी गांधीजीनी आपले विचार व्यक्त केले आहेत. व्यक्तीला इच्छेनुसार व्यवसाय करण्याची मुभा ते देऊ इच्छित नाहीत. वर्ण हे ज्या व्यक्तीच्या जन्माच्या आधीच ठरलेला असतो. गांधीजींच्या या कल्पना समाजाशी विसंगत तर व्यवहाराच्या कसोटीवर देखील टिकणाऱ्या नाहीत.

**जात :-**

जात या संबंधीची महात्मा गांधीजी यांचे मते वेळोवेळी बदललेली आढळतात.

१) हिंदू समाज जिवंत आहे याला कारण हिंदू समाजाचा आधार जातीव्यवस्था आहे असा त्यांचा विश्वास होता.

२) स्वराज्याची बीजे जातीव्यवस्थेत शोधावी लागतील.

३) जि व्यवस्था जातीव्यवस्था निर्माण करू शकली त्या व्यवस्थेतच संघटन शक्तीची अमाप क्षमता आहे असेच म्हणावे लागेल.

4) जातीव्यवस्था हि प्राथमिक प्रचार प्रसाराची सहज उपलब्ध व्यवस्था होय. प्रत्येक जात हि त्या जातीतील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सहज स्वीकारू शकते. जातीव्यवस्थेला राजकीय आधार आहे. जात हि न्यायव्यवस्थेचे कार्य करू शकते.

५) राष्ट्रीय एकात्मतेसाठी जातीजातीत रोटी-बेटी व्यवहार आवश्यक आहे यावर महात्मा गांधीजींचा विश्वास नाही.

अश्याप्रकारे वर्णव्यवस्था व जातीसंबंधी गांधीजीनी आपली मते व्यक्त केली आहेत.त्यांच्या ह्या विचारांमध्ये १९२६ सालापासून बदल झालेले आहेत.

राजकीयदृष्ट्या सत्तेमध्ये प्रत्येक धार्मिक व जातीय समूह आपल्या प्रतिनिधित्वाची अपेक्षा धरू लागला. धार्मिक व जातीय विभाजनाला सुरुवात झाली. राष्ट्रीय चळवळीच्या ध्येय-धोरणांवर होऊ शकतो यांची जाणीव झाल्याने वर्णव्यवस्थे पासून जातीव्यवस्था वेगळी असल्याचे विचार गांधीजी व्यक्त करू लागले. गांधीजी म्हणतात कि माणसांतील विषमतेवरही माझा विश्वास नाही. आपण सगळे समान आहोत परंतु समता आत्म्यांची आहे, शरीराची नाही. त्यामुळे हि एक मानसिक स्थिती आहे. या भौतिक जगात फार मोठी विषमता असल्यामुळे आपण समतेचा विचार करून तिच्याकरिता प्रयत्न केला पाहिजे.

एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीपेक्षा स्वतःला मोठे समजणे हा ईश्वर आणि माणूस यांच्या विरुध्द केलेला अपराध आहे. त्यामुळे लहानमोठे भेद करणाऱ्या जाती वाईट आहेत.गांधीजी जातीव्यवस्थेला गैरलागू आणि अनावश्यक मनात आहेत. वर्णाचा आणि त्या जातीचा काहीसा संबंध नाही असे ते म्हणत होते.

**निष्कर्ष :-**

१९३२ साली पुणे करार झाल्यानंतर गांधीजींच्या जाती व वर्णव्यवस्थेविषयक मतांमध्ये खूपच बदल झाले. सहभोजन आणि मंदिर प्रवेशाला अनुकूल नसणारे गांधी सहभोजन आणि मंदिर प्रवेशाच्या कार्यक्रमांना सहमती देत मंदिर प्रवेश व सहभोजनाचे कार्यक्रम हाती घेतात व शिवाय ज्या मंदिरांमध्ये अस्पृश्यांना प्रवेश दिला जात नाही त्या मंदिरांमध्ये जाण्याचे नाकारतात.

**संदर्भसूची :-**

१) आंबेडकर बी. आर. २०१६, भारतातील जाती : त्यांची यंत्रणा उध्दव आणि विकास अनुवादक शुभांगी थोरात, मुक्त शब्द, संपादक येशू पाटील, मुंबई.

२) श्रीनिवास एम. एन., २०१६, आधुनिक भारत मे जाती, रामकमल प्रकाशन, दिल्ली.

३) प्रभू आर. के. आणि राव यु. आर., २०१० महात्मा गांधींचे विचार संकलन, अनुवाद ब्रिजमोहन हेड, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद.